# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप /केंस क्र.१२/२०१७-१८/२३५     दिनांक : ३०-०६-२०१७

**आदेश केस क्र. १२ /२०१७-१८**

| | | |
|---|---|---|
| | श्री प्रदिपकुमार आण्णासाहेब भोसले<br>मु.पो. हेरले. ता.हातकणंगले<br>जि.कोल्हापूर | **तक्रार<br>अर्जदार<br>(ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, जयसिंगपूर | **विरुध्द<br>पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग  हातकणंगले | |

**कोरमः-**
१.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) उपरोक्त तक्रारदार यांनी प्रस्तुतचे गा-हाणे अपिल त्यांना कृषी पंपासाठी त्वरीत वीज जोडणी मिळणेकरिता आणि नुकसान भरपाई मिळणेसाठी या मंचासमोर दि.१५-०५-१७ रोजी दाखल केले आहे.

**<u>संक्षिप्त गा-हाणे</u>**

२) सदर तक्रारदार यांनी त्यांच्या मौजे हेर्ले ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील गट क्र.४५२ या जमिनीत कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी मिळण्यासाठी वि.प. यांच्याकडे रितसर अर्ज सादर करुन कोटेशन प्रमाणे दिनांक १६-१०-२०१४ रोजी रक्कम रु. ५९५०/- जमा केली. तथापि, तक्रारदार यांना नियमानुसार विहीत मुदतीत वीज जोडणी मिळाली नाही. वि.प. यांचेतर्फे दि. २१-११-२०१५ च्या नोटीसीने, जून २०१६ पर्यन्त वीज जोडणी देण्यात येईल असे कळवले होते. परंतु तशी पूर्तता झाली नाही. अखेर तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष,कोल्हापूर यांचेकडे दिनांक ०८-०२-२०१७ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. सदर कक्षाने दि. १४.०३.२०१७ रोजी निर्णय करुन, जेष्ठता यादीनुसार काम पूर्ण झाल्यानंतर कनेक्शन त्वरीत देण्यात यावे या केलेल्या आदेशाने समाधान न झाल्यामुळे तक्रारदार यांनी या मंचासमोर हे
गा-हाणे दाखल केले आहे.

**<u>वितरण कंपनीची भूमिका</u>**

३) तक्रारदार यांना वीज जोडणी देण्यासाठी तीन पोलची ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारावी लागणार आहे. प्रतिक्षायादीत त्यांचा २७ वा क्रमांक आहे. कंत्राटदारची मुदत संपल्याने कामे बंद आहेत. एजन्सीची नेमणूक झाल्यानंतर तक्ररदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल.

४) सदर प्रकरणाची सुनावणी दि. २८.०६.२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी प्रकृती बरी नसल्याने तक्रारदार हजर नव्हते, परंतु त्यांनी लेखी म्हणणे पाठवले आहे. त्यांचे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे, यांनी तोंडी युक्तिवाद केला. वि.प. यांचेतर्फे कार्यकारी अभियंता श्री सागर मारुळकर, व उपकार्यकारी अभियंता श्री एस.ए. मैलापूर यांनी तोंडी निवेदन केले. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना विशिष्ट कालमर्यादेत कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी देणेबाबतचा वि.प. यांना आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) तक्रारदार यांना विलंबाची भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय?

उत्तरः- अंतिम आदेशाप्रमाणे.

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांनी वि.प.कडे रितसर अर्ज सादर करुन मंजूर कोटेशनप्रमाणे जरुर ती रक्कम दि. १६-१०-२०१४ रोजी वि.प.कडे भरणा केली याबद्दली वाद नाही. त्यांना तीन महिन्यात, नियमानुसार , वीज जोडणी देणेत आली नाही. त्यांना वीज जोडणी देण्यासाठी ३ पोलची ०.१८कि.मी. लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहे. प्रतिक्षायादीत आता तक्रारदार यांचा २७ वा क्रमांक आहे. कंत्राटदाराची नियुक्ती झाल्यानंतर यादीप्रमाणे तक्रारदार यांना वीज जोडणी देता येईल असे वि.प. तर्फे सांगणेत आले. निधी उपलब्ध झाल्यानंतर वीज जोडणी देता येणार आहे. आणि जेष्ठता यादी डावलता येणार नाही असेही वि.प.तर्फे सांगणेत आले.

७) तथापि, आम्ही वि.प.तर्फे केलेल्या युक्तिवादाशी सहमत होऊ शकत नाही. कृती मानके विनियमाप्रमाणे तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे जरुरीचे होते. कृतिमानके विनियम तसेच विद्युत कायदा २००३ चे कलम ४३ यापुढे जेष्ठता यादी, निधीची उपलब्धता नसणे या बाबी अत्यंत गौण ठरतात. विशिष्ट कालमर्यादेत वीज जोडणी देता आली नाही. तर कलम ४३ प्रमाणे दंडात्मक कारवाई आणि कृतिमानके विनियमानुसार विलंबाची भरपाई देण्याची वि.प. यांचेवर जबाबदार पडू शकते. जेष्ठता यादी किंवा प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य ही तत्वे योग्य असली तरी कायद्यांतील कठोर तरतुदीमुळे त्यांना फारसे महत्व देता येत नाही. त्यामुळे तक्रारदार हे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी मिळण्यास पात्र आहेत. असे आमचे निष्कर्ष आहेत.

८) विलंबाच्या भरपाईबाबत सुस्पष्ट अशी मागणी तक्रारदार यांच्या तर्फे केलेल्या निवेदनात आढळून येत नाही. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी अत्यंम मोघम स्वरुपात नुकसान भरपाई देणेबद्दल विनंती केली. या कारणांस्तव आम्ही अंतिम आदेशात नमूद केल्यानुसार विलंबाची भरपाई मंजूर करीत आहोत.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदार श्री प्रदिपकुमार आण्णासाहेब भोसले, रा. हेर्ले ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांना त्यांच्या मागणीनुसार शेती पंपासाठी नविन वीज जोडणी दि. २५-०९-२०१७ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश करणेत येतो. अन्यथा त्यापुढील विलंबाच्या प्रत्येक आठवडयास शभर रुपये प्रमाणे तक्रारदार यांना भरपाई देणेत यावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |